‘‘कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांना वधस्तंभाविषयींचा संदेश मूर्खपणाचा आहे;

पण ज्यांना तारण प्राप्त होत आहे अशा आपणांस तो देवाचे सामर्थ्य असा आहे’’ (1 कंरिथ 1:18).

आज जर तुमचे मरण झाले तर

तुमची सार्वकालिकता कुठे राहील - स्वर्गात की नरकात?

(कृपया काही वेळ या संदेषावर विचार करा. देवाची इच्छा आहे की तुम्ही त्याच्यासोबत स्वर्गात असावे.)

पुष्कळांना वाटते की स्वर्ग नाही किंवा नरक नाही; परंतु पवित्र बायबल, जे एकमेव देवाचे वचन आहे त्यात स्पष्टपणे सांगितले आहे की ही दोन्हीही ठिकाणे वास्तविक आहेत: ‘‘तेव्हां राजा आपल्या उजवीकडच्यांस म्हणेल, अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जें राज्य जगाच्या स्थापनेपासून तुम्हांकरितां सिद्ध केले आहे ते वतन घ्या;........मग डावीकडच्यांसहि तो म्हणेल, अहो शापग्रस्तहो, माझ्यापुढून निघा आणि सैतान व त्याचे दूत ह्यांच्यासाठीं जो सार्वकालिक अग्नि सिद्ध केला आहे त्यांत जा...‘ते तर सार्वकालिक’ शिक्षा भोगावयास जातील; आणि नीतिमान् ‘सार्वकालिक जीवन उपभोगावयास’ जातील’’ (मत्तय 25:34,41, 46).

नरक हे यातनेचे ठिकाण आहे: नरकाविषयी येशूचे शब्द पुढीलप्रमाणे आहेत:‘‘जेथें ‘त्यांचा किडा मरत नाहीं व अग्नि विझत नाहीं’’ (मार्क 9:48, यशया 66:24). ‘‘सार्वकालिक अग्नीं’’ (मत्तय 18:8; 25:41). ‘‘नरकाग्नी’’ (मत्तय 5:22; 18:9). ‘‘अग्नीची भट्टी’ (मत्तय 13:42, 50). ‘‘तेथे रडणे दांत खाणे चालेल’’ (मत्तय 8:12; 22:13; 25:30). ‘‘सार्वकालिक शिक्षा’’ (मत्तय 25:46) व ‘‘बाहेरील अंधार’’ (मत्तय 8:12; 22:13). ‘‘ ’ज्या कोणाचें नांव ‘जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेलें सांपडलें नाहीं,’ तो अग्नीच्या सरोवरांत टाकिला गेला’’ (प्रकटीकरण 20:15). ‘‘ज्या अर्थी माणसांना, एकदांच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविलें आहे’’ (इब्री 9:27). नरक सैतान व त्याच्या दुष्ट आत्म्यांकरिता तयार करण्यात आला असल्यामुळे देवाची इच्छा नाही की त्याठिकाणी आपण असावे.

मग, या शिक्षेमागील कारण काय?

पाप. प्रत्येक गोष्ट जी तुम्हाला देवापासून विभक्त करिते ती पाप आहे. जे शब्द, जी कृती व जे विचार तुम्हाला देवापासून विभक्त करितात ते पाप आहेत. आपण जन्मतः पापी आहोत व पापात जगतो. देव पवित्र आहे आणि पाप आपल्याला देवापासून विभक्त करिते. ''एका माणसाच्या द्वारें पाप जगांत शिरलें आणि पापाच्या द्वारें मरण शिरलें; आणि सर्वांनी पाप केल्यामुळें सर्व माणसांमध्यें अशा प्रकारें मरण पसरलें'' (रोम 5:12). ''कारण सर्वांनीं पाप केलें आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत'' (रोम 3:23). ''कारण पापाचें वेतन मरण आहे, पण देवाचें कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्यें सार्वकालिक जीवन आहे'' (रोम 6:23).

देवाचे एकमेव वचन, पवित्र बायबलमधून पापांची काही उदाहरणे पुढे दिली आहेत:''कारण जगांत जें सर्व आहे तें, म्हणजे देहाची वासना. डोळयांची वासना व संसाराविषयींची फुशारकी, हीं पित्यापासून नाहींत, तर जगापासून आहेत'' (1 योहान 2:16). ''सर्व प्रकारची अनीति पापच आहे; तरी पण ज्याचा परिणाम मरण नाहीं असेंहि पाप आहे'' (1 योहान 5:17). येशूने म्हटले,''कारण आंतून म्हणजे माणसाच्या अंतःकरणांतून वाईट विचार निघतात; जारकर्मे, चोय्रा, खून, व्यभिचार, लोभ, दुष्टपणा, कपट, कामातुरपणा, दुष्ट नजर, शिव्यागाळी, अहंकार, मूर्खपणा'' (मार्क 7:21,22). ''परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ,'खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक व सर्व लबाड माणसें ह्यांच्या वांट्यास 'अग्नीचें व गंधकाचें' सरोवर येईल; हेंच तें दुसरें मरण आहे'' (प्रकटीकरण 21:8). ''तिच्यांत कोणत्याहि निषिद्ध गोष्टी' आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम ह्यांचा 'प्रवेश होणारच नाहीं,' तर कोंकय्राच्या जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेल्या लोकांचा' मात्र होईल'' (प्रकटीकरण 21:27). ''जारकर्मी, अशुद्ध कृति करणारा किंवा लोभी, हा मूर्तिपूजक आहे; असल्या कोणासहि ख्रिस्ताच्या व देवाच्या राज्यांत वारसा नाहीं हें तुम्हीं जाणूनच आहां'' (इफिस 5:5). ''देहाचीं कर्मे तर उघड आहेत; तीं हीं: जारकर्म, अशुद्धपणा, कामातुरपणा, मूर्तिपूजा, चेटकें, वैर, कलह, मत्सर, राग, तट, फुटी, पक्षभेद, हेवा, दारूबाजी, रंगेलपणा आणि अशा इतर गोष्टी; ह्यांविषयीं मीं तुम्हांला पूर्वी जें सांगून ठेविलें होते तेंच आतां सांगून ठेवितों कीं, अशी कर्मे करणाÚयांना देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाही'' (गलती 5:19-21). ''अनीतिमान् माणसांना देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाहीं हें तुम्हांला ठाऊक नाहीं काय? फसूं नका; जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, स्त्रीसारखा संभोग देणारे, पुरुषसंभोग घेणारे, चोर, लोभी, मद्यपी, चहाड व वित्त हरण करणारे ह्यांना देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाहीं'' (1 करिंथ 6:9,10). ''ह्या कारणामुळे देवानें त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केलें; त्यांच्यांतल्या स्त्रीयांनीं शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केलें. तसेंच पुरुषांनीहि स्त्रीयांचा नैसर्गिक उपभोग सोडून परस्परें कामसंतप्त होऊन पुरुषांनीं पुरुषांबरोबर अनुचित कर्म केलें आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचें योग्य प्रतिफळ आपल्या ठायी भोगिले'' (रोम 1:26,27).

मूर्तिपूजा: जे ख्रिस्ती लोक संतांची भक्ती करितात, मेलेल्यांकडे प्रार्थना करितात, मेलेल्यांकरिता प्रार्थना करितात... ते पहिली आज्ञा मोडतात. ''माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत. आपल्यासाठी कोरीव मूर्ति करू नको, वर आकाशांतील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या जलातील कशाचीही प्रतिमा करू नको. त्याच्या पाया पडू नको किंवा त्याची सेवा करू नको. कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे....'' (निर्गम 20:3-5). येशूखेरीज दुसरा देव नाही. ''कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांमध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे'' (1 तीमथ्य 2:5).

व्यभिचार: विवाहापूर्वीचे किंवा विवाहबाह्य शारीरिक संबंध म्हणजे व्यभिचार. विवाहापूर्वीच्या संबंधांना लैंगिक अनैतिकता म्हटले आहे.पतीपत्नीतील शारीरिक संबंधांना देवाची परवानगी आहे. ''मी तर तुम्हांला सांगतों, जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेनें पाहातो त्यानें  आपल्या मनांत तिच्याशीं व्यभिचार केलाच आहे'' (मत्तय 5:28).

सूटपत्र: ''मी तर तुम्हांला सांगतों कीं, जो कोणी आपली बायको व्यभिचाराच्या कारणावांचून टाकितो, तो तिला व्यभिचारिणी करितो आणि जो कोणी अशा टाकिलेल्या बायकोबरोबर लग्न करितो तो व्यभिचार करितो'' (मत्तय 5:32). ''लग्न सर्वस्वी आरदणीय असावें व अंथरून निर्दोष असावें; जारकर्मी व व्यभिचारी ह्यांचा न्याय देव करील'' (इब्री 13:4). येशूने म्हटले, ''ह्यास्तव देवानें जें जोडिलें आहे तें मनुष्यानें तोडूं नये'' (मार्क 10:9). ''स्त्रियांनो, तुम्ही जशा प्रभूच्या अधीन तशा आपआपल्या पतीच्या अधीन असा...पतींनो, जशी ख्रिस्तानें मंडळीवर प्रीति केली तशी तुम्हीहि आपआपल्या पत्नीवर प्रीति करा; ख्रिस्तानें मंडळीवर प्रीति केली आणि स्वतःस तिच्यासाठीं समर्पण केले'' (इफिस 5:22,25).

दारू पिणे, धुम्रपान करणे, आत्महत्या करणे, अमली पदार्थांचे सेवन करणे व शरीरावर टॅटू रंगविणे ...: ''तुम्हीं देवाचें मंदिर आहां आणि तुम्हांमध्यें देवाचा आत्मा वास करितो हें तुम्हांस ठाऊक नाहीं काय? जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करितो तर देव त्याचा नाश करील; कारण देवाचें मंदिर पवित्र आहे, तेंच तुम्ही आहां'' (1 करिंथ 3:16,17). ''कोणी मृत झाल्यामुळे आपल्या अंगावर वार करून घेऊ नका किंवा आपले अंग गोंदवून घेऊ नका; मी परमेश्वर आहे'' (लेवीय 19:28). आपण सर्वच यादी तयार करू शकणार नाही; परंतु, या सर्व गोष्टी आपल्यातील पापी स्वभाव दर्शवितात.

तुम्ही पापी आहात अशी तुम्हाला जाणीव आहे का? जर होय, तर तुम्हाला देवासोबत समेट करण्याची संधी आहे.

देव तुमच्यावर प्रीती करितो व तुमचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही.

‘‘देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठीं कीं, जो कोणी त्याच्यावर विश्‍वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें’’ (योहान 316). ‘‘चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ति व्हावी व ती विपुलपणें व्हावी म्हणून आलों आहें’’ (योहान 10:10). ‘‘कारण पापाचें वेतन मरण आहे, पण देवाचें कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्यें सार्वकालिक जीवन आहे’’ (रोम 6:23). ‘‘परंतु देव आपणांवरच्या स्वतःच्या प्रीतीचें प्रमाण हें देतों कीं, आपण पापी असतांनाच खिस्त आपणांसाठीं मरण पावला’’ (रोम 5:8).

आपल्या सत्कर्मांद्वारे लोक देवापर्यंत पोहंचण्याचा प्रयत्न करितात.

वधस्तंभाशिवाय इतर कोणत्याही मार्गाने आपण देवापर्यंत पोहंचू शकत नाही.

‘‘येशूनें त्याला म्हटलें, मार्ग, सत्य व जीवन मीच आहें; माझ्याद्वारें आल्यांवाचून पित्याकडे कोणी येत नाहीं’’ (योहान 14:6).

येशूच केवळ मार्ग आहे.

‘‘ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगांत आला, हें वचन विश्‍वसनीय व पूर्णपणें स्वीकारावयास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकीं मी मुख्य आहें’’ (1 तीमथ्य 1:15). ‘‘त्या पुत्राच्या ठायीं, खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ति म्हणजे आपल्या पांपाची क्षमा आपल्याला

मिळाली आहे’’ (कलस्सै 1:14). ‘‘त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणें त्या प्रियकराच्या ठायीं त्याच्या रक्ताच्या द्वारें खंडणी भरून मिळविलेली मुक्ति म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा आपल्याला मिळाली आहे’’ (इफिस 1:7). ‘‘आणि तारण दुसर्‍या कोणाकडून नाहीं; कारण जेणेंकरून आपलें तारण होईल असें दुसरे कोणतेहि नांव आकाशाखालीं मनुष्यांमध्यें दिलेलें नाहीं’’ (प्रेषित 4:12).

तुम्ही देवाचे मूल कसे व्हाल? येशूचा आपला तारणारा म्हणून स्वीकार करा.

‘‘ते म्हणाले प्रभू येशूवर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचें तारण होईल’’ (प्रेषित 16:31). ‘‘परंतु जितक्यांनीं त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नांवावर विश्वास ठेवणाÚयांना त्यानें देवाचीं मुलें होण्याचा अधिकार दिला’’ (योहान 1:12). ‘‘कीं, येशू प्रभु आहे असें जर ‘तूं आपल्या मुखानें’ कबूल करिशील आणि देवानें त्याला मेलेल्यातूंन उठविलें असा ‘आपल्या अंतःकरणांत’ विश्वास ठेवशील तर तुझें तारण होईल’’ (रोम 10:9). ‘‘ज्याला पाप ठाऊक नव्हतें त्याला त्यानें तुमच्याआमच्याकरितां पाप असें केलें; ह्यासाठीं कीं, आपण त्याच्या ठायीं देवाचें नीतिमत्त्व असें व्हावें’’ (2 करिंथ 5:21).

यशयाने अनेक शतकांपूर्वी येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावर खिळले जाण्याविषयी भविष्यवाणी केली होती:‘‘खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले, तरी त्यास ताडण केलेले, देवाने त्यावर प्रहार केलेले व त्याला पिडिलेले असे आम्ही त्याला लेखिले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधामुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला; आम्हांस शांती देणारी अशी शिक्षा त्यांस झाली, त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले’’ (यशया 53:4,5). ‘‘त्यानें स्वतः तुमचीं आमची पापें’ स्वदेहीं ‘वाहून’ खांबावर ‘नेलीं,’ ह्यासाठीं कीं, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठीं जगावें. त्याला बसलेल्या ‘मारानें तुम्ही निरोगी झालां आहां’’ (1 पेत्र 2:24). ‘‘तर आपण एवढ्या मोठ्या तारणाकडे दुर्लक्ष केल्यास आपला कसा निभाव लागेल? तें सांगण्याचा आरंभ प्रभूकडून झाला असून ते ऐकणायांनीं त्याविषयीं आपल्याला प्रमाण पटविलें?’’ (इब्री 2:3). ‘‘कारण तो म्हणतोः ‘अनुकूलसमयीं मीं तुझे ऐकलें, व तारणाच्या दिवशीं मीं तुला साहाय्य केलें;’ पाहा, आतांच ‘समय अनुकूल आहे;’ पाहा, आतांच तारणाचा दिवस आहे’’ (2 करिंथ 6:2).

तुम्ही आता येशू ख्रिस्ताचा आपला प्रभु म्हणून स्वीकार कराल का? तो तुमच्यावर प्रीती करितो!

तुम्ही येशू ख्रिस्ताचा वैयक्तीक तारणारा म्हणून कसा स्वीकार कराल?

तुम्ही पापी आहात असे कबूल करा व पश्चात्ताप करा. विश्वास ठेवा की प्रभु येशू ख्रिस्ताने तुमच्या पापांकरिता वधस्तंभावर मरण सहन केले व तिसय्रा दिवशी तो कबरेतून पुनरुत्थित झाला. भग्न हृदयाने प्रभु येशूला पुढीलप्रमाणे विनंती करा, ‘‘माझ्या प्रिय प्रभु येशू, मी कबूल करतो की मी पापी आहे. मला तू क्षमा कर. माझा विश्वास आहे की तू माझ्या पापांकरिता मरण पावला आणि तिसय्रा दिवशी मरणांतून पुन्हा उठला. मी माझ्या पापांकडे पाठ फिरवितो आणि माझ्या जीवनात व

अंतःकरणात येण्याची तुला विनवणी करितो. मी तुला माझा प्रभु व तारणारा म्हणून तुझ्यावर विश्वास ठेवतो व तुझ्या मागे येतो. तुझ्या पवित्र नावात ही प्रार्थना केली आहे म्हणून तू ऐक. आमेन.

जर तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली असेल तर तुम्ही तारल्या गेला आहात, तुम्हाला नवीन जन्माचा अनुभव घडला आहे.

''ती म्हणाली, प्रभुजी, कोणीं नाहीं. तेव्हां येशू तिला म्हणाला, मीहि तुला दंड ठरवीत नाहीं; जा; ह्यापुढें पाप करूं नको'' (योहान 8:11). त्याच्यामध्ये राहा.''जो कोणी त्याच्या ठायीं राहतों तो पाप करीत नाहीं; जो कोणी पाप करितो त्यानें त्याला पाहिलें नाही व त्याला ओळखिलेंहि नाही'' (1 योहान 3:6). आता तुम्हाला पापांपासून मुक्ती मिळाली आहे. मरणाच्या भयापासून मुक्ती मिळाली आहे. जीवनाच्या पुस्तकात तुमचे नाव लिहिल्या गेले आहे. तुम्ही आता स्वर्गाचे वारीस झाला आहात. आता तुम्ही बायबलवर विश्वास ठेवणाय्रा व त्यावर चालणाय्रा मंडळीचा शोध घ्या व तिथे बाप्तिस्मा घ्या. पवित्र शास्त्र पुढीलप्रमाणे सांगते,''पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नांवानें बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचें दान प्राप्त होईल'' (प्रेषित 2:38).

पाण्याने बाप्तिस्मा: ''ह्यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नांवानें बाप्तिस्मा द्या'' (मत्तय 28:19). पाण्याने बाप्तिस्मा ही परिवर्तनानंतर आज्ञापालनाची कृती आहे जी दर्शविते की आपली पापे धुतल्या गेली आहेत. पाणी शिंपडून बाप्तिस्मा करण्याऐवजी पाण्यात डुबून बाप्तिस्मा व्हावा. जो कोणी बाप्तिस्मा घेईल त्याला त्याचा अर्थ कळावा म्हणून लहान लेकरांचे बाप्तिस्मे हे बायबलच्या शिकवणीप्रमाणे नाहीत. आपण पश्चात्ताप करावा व तारण झाल्यास बाप्तिस्मा घ्यावा. पाण्याचा बाप्तिस्मा दर्शवितो की आपला जुना मनुष्य पुरल्या गेला आहे, त्याची मरणाची कार्ये पुरल्या गेली आहेत. जेव्हा आपण पाण्याबाहेर निघतो तेव्हा दर्शविल्या जाते की ख्रिस्तामध्ये आपल्याला नवीन जीवन प्राप्त झाले आहे (रोम 6:1-18). ''कारण तुम्हांमधील जितक्यांचा

ख्रिस्तामध्यें बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनीं ख्रिस्ताला परिधान केलें आहें'' (गलती 3:27). पाण्याने बाप्तिस्मा झाल्याबरोबर पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा प्राप्त कराल (पवित्र आत्मा त्रैक्यातील एक आहे.)

पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा: देवाकडून मिळणारे दान. येशूने म्हटले, ‘‘तुमचा बाप्तिस्मा थोड्या दिवसांनीं पवित्र आत्म्यानें होईल’’ (प्रेषित 1:5). ‘‘नंतर पेन्टेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेव्हां ते सर्व एकत्र जमले असतांना, अकस्मात् मोठ्या वाय्राच्या सुसाट्यासारिखा आकाशांतून नाद झाला व ज्या घरांत ते बसले होते तें सर्व त्यानें भरले आणि वेगवेगळया होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकएक अशा बसल्या. तेव्हां ते सर्व जण पवित्र आत्म्यानें परिपूर्ण झाले आणि आत्म्यानें जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळया भाषांतून बोलूं लागले’’ (प्रेषित 2:1-4). तुम्हाला सामथ्र्य प्राप्त झाल्यावर तुम्हाला पवित्र आत्म्याची दाने व फळ प्राप्त होतील, तुम्ही अन्य भाषेत बोलाल, या जगात तुम्ही सामथ्र्यशाली ख्रिस्ती जीवन जगाल व ख्रिस्ताची साक्ष व्हाल. प्रत्येक खरी ख्रिस्ती व्यक्ती मिशनरी वा सुवार्तिक असते.

येशू लवकरच परत येत आहे: ‘‘कारण आज्ञाध्वनि, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असतां प्रभू स्वतः स्वर्गांतून उतरेल; आणि ख्रिस्तामध्यें जे मेलेलें आहेत ते पहिल्यानें उठतील; नंतर जिवंत उरलेले आपण त्याच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठीं मेघारूढ असे अंतराळांत घेतले जाऊं, आणि तसेच सदासर्वदा प्रभूजवळ राहूं’’ (1 थेस्सलनी 4:16,17). म्हणून सर्वत्र सुवार्ता गाजवा व शक्य तेवढ्या जास्त लोकांचे तारण साधा.

येशू ख्रिस्त पाप्यांना तारितो, रोग्यांना बरे करितो, पवित्र आत्मा देतो, राजा म्हणून लवकर परत येणार आहे, त्याच्या स्वागतासाठी तयार असा.

दररोज पवित्र बायबल वाचा. पवित्र आत्म्याच्या सामथ्र्याने प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे पित्याकडे प्रार्थना करा, पवित्र ख्रिस्ती जीवन जगा, पवित्र आत्मा सांगेल त्या मंडळीमध्ये जा व जगामध्ये ख्रिस्ताची साक्ष व्हा.

जर तुम्ही शारीरिक, आर्थिक किंवा हृद्याविषयीच्या समस्येत आहात तर आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करू.

सेवेविषयी तुमचे काही प्रश्‍न असतील, बायबलमधील सत्यांविषयी अधिक स्पष्टीकरण हवे असेल किंवा भारतातील व इतर

राष्ट्रांमधील संजीवनाकरिता एकत्र मिळून प्रार्थना करायची असेल तर आमच्याशी संपर्क साधा:

SWMI, POST BAG NO. 4, KUNNOM P.O., MAVELIKKARA, ALLEPPEY DISTRICT, KERALA STATE, INDIA - 690 108

Email: ReviveIndia2012@gmail.com
www.shalomworldmission.org